# सरस

नीलिमा किराणे

विक्रमादित्याने आपला हट्ट सोडला नाही. तो पुन्हा झाडापाशी गेला. वेताळाला खांद्यावर घेऊन नेहमीप्रमाणे चालू लागला.

वेताळ म्हणाला, "राजा, तू हट्ट सोडणारच नसशील तर मी तुला आणखी एका कुटुंबाची कथा सांगतो. साक्षी, तिचा मोठा भाऊ रोहन आणि त्यांच्या घराची ही गोष्ट तुला प्रत्यक्ष घडताना दिसेल.बघ."

दहावीतला रोहन अभ्यासाला बसला होता. त्याच्या जवळच चित्र काढत बसलेल्या साक्षीनं एफ एम वर जोरानं गाणी लावली. ती स्वतःही मोठमोठयानं रेडिओसोबत गायला लागली. रोहन वैतागला. 'गाणी बंद कर' म्हणून ओरडला.त्याचीच वाट पाहात असल्यासारखी साक्षीनं वाद घालायला सुरूवात केली. वादावादी लवकरच गुद्दागुद्दीपर्यंत पोहोचली. आवाज ऐकून आई धावत आली. काय घडलंय ते लक्षात आल्यावर साक्षीच्या पाठीत आईचा एक दणका बसला.

'दादा दहावीला आहे ना साक्षी? का त्रास देतेस त्याला? नेहमीचं आहे तुझं. अभ्यास तर बाजूलाच राहिला पण चित्र तरी पूर्ण कर. काहीच धड करत नाहीस. सगळं उखीरवाखीर. रोहनची बहीण मुळीच शोभत नाहीस.'

'मी कशाला? तोच शोभत नाही माझा भाऊ. बावळा नुसता अभ्यास एके अभ्यास करत बसतो. काल वर्गात सिद्धांत याच्याशी बोलत होता तर सरांनी यालाच तासभर उभं केलं. साधी स्वतःची बाजू मांडता येत नाही त्याला. बावळट. मला सिद्धांतनंच सांगितलं.'

'हं. रोहनचं पहिल्यापासून असंच. तू दोन वर्षांची असतानासुद्धा किती घडाघडा बोलायचीस. कविता, गाणी म्हणायचीस. तेवढं हा पाच वर्षांचा असून पण बोलत नव्हता.'

‘आईऽ, कधीकाळचं का बोलतेयस? आजचं बघ ना.’ साक्षीनं आपल्यावर उलटवलेलं समजून रोहन वैतागला.

‘हो.हो. तू विषय बदलू नको साक्षी. दादाला जे येतं ते तुला येत नाही. तुझ्या बोलण्याचं कौतुक केल्यामुळे तू आगाऊ झालीयस. जरा कुणाला काही चांगलं म्हटलं की राग येतो तुला. मग आपणही चांगलं वागून दाखवावं ना. सतत कुणाशी ना कुणाशी भांडणं घरात आणतेस. रोहनबद्दल कधी कुणाची तक्रार आली नाही. तुझ्याबद्दल मात्र जगाच्या तक्रारी.’ आईचा पट्टा सुरू झाला.

‘अग, किती भांडताय, किती आवाज. उगीच रोहिणीकडून लवकर परत आले बाई. तिथेच बरी होते मी. केवढं मोठं घर तिचं. आपापल्या खोलीत कितीही आवाज झाला तरी दुसऱ्यांना त्रास नाही. या तुमच्या फ्लॅटमधे जरा खुट्ट वाजलं की सर्वांना आवाज जातो.’ स्वयंपाकघरातून आजी ओरडली

‘हं. यांचं तिसरंच. मग राहायचं ना तिथेच लेकीकडे. एवढया मोठया घरात माणसाचं माणसाला तोंड दिसत नाही म्हणून इथे परत आलात ना?’ आई पुटपुटली ते आजीला ऐकू गेलं नाही, पण साक्षीनं नीट ऐकलं. ते जाणवून आई पुन्हा साक्षीवर घसरली.

‘अगदी आजीवर गेलीयस तू साक्षी. आपल्या माणसांचं कध्धी कौतुक वाटत नाही.’

•••

साक्षी चित्र काढत होती. तोच बाबा आले.

“साक्षी, अगं सारखी चित्रं काढतेस. अभ्यास करतच नाहीस. सातवीसारखे पन्नास टक्के चालणार नाहीत हं यंदा.”

“बाबा, शाळेत वर्गसजावटीची स्पर्धा आहे. त्यासाठी करतेय.”

“बरं. पण फार वेळ घालवू नको अशा लष्करच्या भाकऱ्यांत. अभ्यास जास्त महत्त्वाचा. नुसती कला काय उपयोगाची? ती तन्वी बघ. इतके चांगले मार्क मिळवते, वर चित्रंही तुझ्यापेक्षा सुंदर काढते. असं

पाहिजे." बाबा म्हणाले. साक्षी बिथरली. "आता गणपतीचं डेकोरेशन करते का बघा." रागारागानं पुटपुटत तिनं रंगाचं सामान ठेवून दिलं.

●●●

रोहन आनंदानं उडया मारतच घरी आला. त्याला सहामाहीला नव्वद टक्के पडले होते. आईबाबांनी आनंदानं त्याचं खूप कौतुक केलं. एक छान शर्ट बक्षीस दिला. जेमतेम साठ टक्के मिळालेली साक्षी पडेल चेहऱ्यानं बघत होती. रोहनच्या हुशारीचं, समंजसपणाचं आई, बाबा, आजी सगळे जणं कौतुक करताना पाहून तिचा तीळपापड झाला. आत जाऊन तिनं थोडी आदळआपट केली. मग गुपचूप टेबलावर पडलेली रोहनची वही लपवून ठेवली आणि साळसूदपणे बाहेर येऊन कौतुकात सामील झाली.

वेताळानं पुढची काही दृश्य झरझर दाखवली. साक्षी रोहनच्या वस्तू लपवत होती, अभ्यासाचा वेळ शोधाशोधीत गेल्यावर कासावीस झालेल्या रोहनला पाहून असुरी आनंदानं हसत होती. 'कसला बावळा आहे रोहन' म्हणून त्याच्या मित्रांपाशी त्याची टिंगल करत होती, तन्वीच्या चित्रावर हळूच पाणी सांडत होती, वर्गातल्या मुलामुलींच्या बारीक खोडया काढत होती, हे सगळं इतकं सराईतपणे चालू होतं की तिच्यावर संशय सहसा जात नव्हता.

तिची नजर आणि कान तीक्ष्ण होत गेलेले राजाच्या जाणवले. दुसऱ्यातली छोटीशीही कमी शोधून त्यावर बोचरी कॉमेंट करायची आणि 'कशी जिरवली' करत हसायचं एवढंच पुन्हापुन्हा करताना ती राजाला दिसत होती. आईबाबांचं आर्थिक अडचणीबद्दलचं बोलणं ती चोरून ऐकतेय हे देखील राजानं पाहिलं.

दुसऱ्या दिवशी साक्षी आईला म्हणाली, 'मला म्यूरल्स आणि कलाकुसरीच्या शिबिराला जायचंय. दोन हजार रूपये फी आहे.'

"आधी सहामाहीत ऐंशी टक्कयांच्या वर जाऊन दाखव आणि मग वाढव तुझी कला." आई म्हणाली.

“माझ्या मार्कांचं कशाला काढतेस? तुझ्याकडे पैसे नाहीत ते सांग ना. तुझ्या सगळया अटी मलाच लागू. रोहनला तो म्हणेल तिथे पाठवतेस. तन्वीचं कौतुक करतेस, पण तिला घरात स्वतंत्र खोली आहे, तिची आई तिला कुठल्याकुठल्या शिबिरांना पाठवते आणि किती महागडे रंग आणि वस्तू घेऊन देते ते तू पाहणार नाहीस..” साक्षी आईच्या अंगावरच आली.

“हो. तुम्हाला सगळं मिळतंय तरी कटकट. आम्ही कसे दिवस काढलेत लहानपणी.. तुझ्या वयात असं वर तोंड करून तर कधीच बोललो नाही आम्ही...” आई हातवारे करत म्हणाली. आपण दोघींचं युद्ध पाहातोय असं वाटताना, राजाला दिसणारं दृश्य धूसर होत गेलं.

•••

वेताळ म्हणाला, “राजा, साक्षी सतत युद्धाच्याच पवित्रयात का असते? ती कधी कुणाला टार्गेट करेल, काय बोलेल याचा अंदाजच येत नाही. तिच्या बोलण्यात तथ्य असल्यामुळे तिला खोडूनही काढता येत नाही. साक्षी कधीच बदलणार नाही का?” या प्रश्नांची उत्तरं माहीत असून तू दिली नाहीस तर तुझ्या डोक्याची शंभर शकलं......”

“हा प्रश्न एकटया साक्षीचा नाही वेताळा. या घराच्या समस्यांचं मुख्य कारण ‘सततची तुलना’ हे आहे. कशाशीतरी तुलना केल्याशिवाय या घरातलं कुणी बोलतच नाही. तसंच बोलण्याची आणि विचार करण्याची त्यांची पद्धत पडली आहे. आजी मुलीच्या आणि मुलाच्या घराची तुलना करते. आईबाबा साक्षीची तुलना रोहन, तन्वीशी करतात. आई कधी स्वतःच्या लहानपणाशी तर कधी आजीशी पण करते. तोच धागा साक्षीनं पकडला आहे. स्वतःला सिद्ध करण्यासाठी साक्षीला कुणातरी ‘पेक्षा’ सरस दिसायला हवं.

“पण म्हणून साक्षीनं असं वागावं? संधी साधून लागट बोलावं?’

‘हो . कारण तिच्याजवळच्या क्षमतांचं घरच्यांना कौतुक कमी आहे . कलेत सुद्धा ती तन्वी पेक्षा कमीच वाटते आईला . अभ्यासात तिनं कितीही प्रयत्न केले तरी ती रोहनपेक्षा कमी पडणारच याची तिला खात्री आहे . त्यामुळे स्वतः कष्ट घेण्यापेक्षा रोहनला त्रास देण्याचा मार्ग तिनं निवडलाय . आपण सतत सगळीकडे कमी पडणं कुणालाच आवडत नाही . साक्षीची दुसरी क्षमता आहे परिस्थिती समजून घेऊन बोलणं . मात्र या गुणाचा ती पुढे जाण्यासाठी विधायक वापर करत नाही . इतरांची कमी दाखवून त्यांची बोलती बंद करायची, विषय बदलायचा, टार्गेट स्वतःवरून दुसऱ्याकडे सरकवायचं किंवा धक्का तंत्र वापरून समोरच्याला विचलित करायचं अशा पद्धतीनं ती स्वतःची क्षमता नकारात्मकतेनं वापरते आहे . तिची सगळी बुद्धी आणि ऊर्जा पुढे जाण्यासाठी वापरण्याऐवजी ती स्व-संरक्षणासाठी वापरते आहे . समोरच्याला गप्प करणं म्हणजेच तिचं स्वतःला सिद्ध करणं झालं आहे .”

“म्हणजे राजा, या घरातली युद्धपरिस्थिती कायमच राहणार का?”

“घरातल्या मोठया माणसांनी आपण ‘तुलनेचे’ बळी आहोत हे लक्षात घेतलं तर परिस्थिती हळूहळू बदलू शकेल . समोरच्याला छोटं करून आपण मोठे होत नाही हे समजून घ्यायला पाहिजे . त्याबाबत मुलांशी, परस्परांशी बोललं पाहिजे . एकमेकांना मदत करून या सवयीतून बाहेर यायला पाहिजे . मुलांच्या चांगल्या गोष्टींचं मोकळेपणानं स्वच्छ कौतुक इथे उपयोगी पडू शकेल . थेट सांगायचं तर ‘पेक्षा कमी, पेक्षा जास्त’ हे शब्द पूर्ण बंद केले पाहिजेत . ‘रोहन अभ्यासात, वागण्यात चांगला आहे’, ‘साक्षी खूप चांगली कलाकार आहे’ . तन्वीनं कला आणि अभ्यास दोन्ही जमवलं आहे’ अशी तुलनारहित स्वच्छ वाक्य बोलायला शिकलं पाहिजे . असं केलं तरी साक्षीच्या जुन्या सवयी मधूनच वर येऊ शकतात . दुसऱ्याला आपल्यासमोर चांगलं म्हटलं म्हणजे आपण वाईट आहोत असा निष्कर्ष साक्षी काढू शकते . पण तिच्या गुणांचं कौतुक झाल्यावर ती थोडी निवळेल . हळूहळू तुलनेशिवाय विचार करणं तिलाही जमेल . रोहननं जसा

कुणाच्या अधेमधे न येता आपल्याला जे जमतं त्यात पुढे जाण्याचा मार्ग स्वीकारला आहे तो साक्षीनं लक्षात घेतला तर कालांतरानं तिलाही तसं वागणं थोडंफार जमेल. मात्र त्यासाठी घरातल्या प्रत्येकानं 'आपण कधीच चुकत नाही' या गृहितकातून बाहेर येऊन स्वतःच्या बोलण्याकडे त्रयस्थपणे पाहायला हवं, त्यातून होणारं मुलांचं नुकसान समजून बदलायला हवं वेताळा." राजा म्हणाला.

राजाचं मौन सुटताच, 'तू म्हणतोस ते बरोबर आहे, पण अवघड आहे राजा' असं म्हणत राजाच्या खांद्यावरून अदृष्य झालेला वेताळ झाडाला जाऊन लोंबकळू लागला.

•••

लोकसत्ता - चतुरंग - गोष्टी भावभावनांच्या- फेब्रूवारी २०१२